# प्रकरण – पाचवे
## ताकारी योजनेचे मूल्यमापन

# ३० प्रकरण पाचवे ०३

## ताकारी योजनेचे मूल्यमापन

भारताच्या ग्रामीण व शेती विकासासाठी पाणी म्हणजे आत्मा आहे. शेतीसाठी, पिण्याच्या पाण्याची समस्या,औद्योगिकरणासाठी पाण्याची अतिशय आवश्कता आहे. व ह्या सर्व घटकांना पाणी देण्याच्या उद्देशाने देशभर लहान-मोठ्या प्रमाणावर धरणे, उपसा सिंचन योजना तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. विकासाच्या राकारणामध्ये निरनिराळी धरणे, पाटबंधारे प्रकल्प उपसा सिंचन योजना बांधून त्याद्वारे हरितक्रांती घडवून आणणे हा एक महत्त्वाचा कार्यक्रम ठरला. त्यामुळे वेगवेगळ्या राजकिय पुढाऱ्यांमध्ये राजकिय ताकद लावण्याचा प्रयत्न करत असता प्रत्येकजण आपल्या मतदारसंघाचा विचार करत असतो. प्रतिष्ठेचा विचार करत असतो. आपल्या मतदार संघामध्ये किंवा आपल्या भागाचा कसा जास्त फायदा होईल व आपल्याला त्यापासून लोकप्रियता कशी मिळेल याकडे लक्ष देवून आपले स्थान कसे बळकट होईल हे पहात असतो. दुसऱ्यांच्या आयत्या पिठावर आपल्याला कशा रेगोठ्या मारता येतील हे पहात असतात.

दुष्काळी भागातील प्रकल्प म्हणजे ताकारी योजना हा प्रकल्प सर्व महाराष्ट्रामध्ये गाजलेला प्रकल्प आहे. दुष्काळी भागाला झुलवत ठेवण्याचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. गेली पंधरा-वीस वर्षे रखडत चाललेली योजना दुष्काळी लोकांची तीने परवडच केली आहे. सांगली जिल्ह्यामध्ये बऱ्याच उमेदवारांनी या पाणी प्रश्नावर आपले भविष्य आजमावले आहे. व राजकारण खेळले आहे. मजूर कष्टकरी संघटनेने आंदोलने मोर्चे धरणे धरली तरी शासन त्यांना दाद देत नाही. अशा प्रकारचा गाजत असलेला हा महाराष्ट्रातील एकमेव प्रकल्प आहे.

पुर्वपार चालत आलेला व कायमचा नशिबी बांधलेला हा दुष्काळ खानापूर तालुक्याच्या पाचवीलाच पुजला आहे. व त्याच्यावरच राजकिय मंडळीनी आपला डाव मांडला आहे. व कित्येक वर्षे यावर राजकारण चालू आहे. शेतकरी संघटना सुद्धा त्याचा पिछा सोडत नाहीत. शासनाला धारेवर धरून संघर्ष करण्याचे काम शेतकरी जनतेने आजपर्यंत केले आहे व करत सुद्धा आहेत.[१]

पावसाचे प्रमाण अनियमित असलेने निर्माण होणारी पाणी टंचाई तसेच आधुनिक काळामधील पर्यावरणातील समतोल बिघडवणाऱ्या घटना घडत असतात व अशा आपत्तीची दखल मानवाला घ्यावी लागते, कारण दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई, भाववाढ, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, स्थलांतर रोजगाराचा प्रश्न, रोगराई या सर्वांना ग्रामीण जतनेला तोंड द्यावे लागते. व्यापारी, सावकार भ्रष्ट अधिकारी यापासून फायदे घेतात व भूमिहिन शेतमजूरांची कुंठित अवस्था होत असते.

दुष्काळ पडल्यानंतर शासन दुष्काळ जाहिर करते. पण त्यावर ठोस निर्णय घेत नाही. तात्पुरता पर्याय वेळ मारून नेत असते. आग लागल्यानंतर विहिर खणायला सुरूवात करण्याचा प्रकार आहे. तर यावर तात्पुरता इलाज न करता गांभीर्याने यावर विचार केला पाहिजे. दुष्काळामध्ये शासन रोजगार निर्मिती करते परंतू दोन-तीन रूपये मजुरी मध्ये त्याचे धड पोट भरत नाही कि त्याला त्याचा उपयोग होत नाही. दुष्काळ हा अत्यंत जुनाट, चिवट आणि ग्रामीण व्यवस्थेवर खोलवर पाळेमुळे रूजलेला आजार आहे. दुष्काळ निर्मूलनासाठी करावयाच्या उपाय योजनेत नैसर्गिक, तांत्रिक, आर्थिक, सामाजिक, राजकिय इ. सर्व घटकांचा समावेश होत असतो. या सर्वांचा विचार करत असताना पावसावरची शेती म्हणजे एक प्रकारचा झुगारच आहे. म्हणून दुष्काळ निर्मूलन कार्यक्रमाद्वारे जमिन अधिक पाण्याखाली कशी येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

पाणी ही राष्ट्राची संपत्ती आहे. त्यावर जनतेचा अधिकार आहे. पण पाण्याचा वापर हा शास्त्रशुद्ध पद्धतीने झाला पाहिजे. कारण गरजेच्या मानाने पुरेसे पाणी उपलब्ध नाही. महाराष्ट्रातील शेतीचे आणि पाण्याचे नियोजन करताना सुमारे ६० ते ७० टक्के जमीन ओलिताखाली आली पाहिजे. ठिबक सिंचन पद्धतीने इझ्राईलने जसा काटकरीने शेतीसाठी पाण्याचा उपयोग केला आहे. त्याचे आपण अनुकरण केले पाहिजे. कमी पाण्यावर फळबाग, त्याचेप्रमाणे वनशेती. अशा अनेक पर्यायांचा कृषि औद्योगिक विकास केला पाहिजे. पाण्याच्या वापराची सर्वात मोठी कार्यक्षमता आणि काटकसर हि उदिष्टये डोळ्यासमोर ठेवून पाण्याचा उपयोग केला पाहिजे. शेतीसाठी पाण्याचा उपयोग हा मानवी जीवनातील विविध उपयोगापैकी एक उपयोग आहे.

या पद्धतीने जर दुष्काळ आणि पाण्याचा मेळ जर घातला तर दुष्काळ कमी होण्यास काही हरकत नाही. पण पाण्याच्या नियोजनाची महत्वाची उपाय योजना केली पाहिजे.[२]

## ५. १ स्वातंत्र्यपूर्व दुष्काळ धोरण :-

प्राचीन व मध्ययुगीन काळात सुद्धा समाज शेतीवरच अवलंबून होता. त्याकाळी बलुतेदारी व कारागीर हे व्यवसाय चालत होते. त्यावेळी सुद्धा महाराष्ट्रातील शेती ही पावसावर अवलंबून होती. विहिरी, तलाव बंधारे वगळता सिंचनाच्या सोयी, विज्ञान-तंत्रज्ञान अस्तित्वात नव्हते. त्यावेळी देवी, पटकी, प्लेग यासारखे रोग येऊन गावेच्या गावे मृत्युमुखी पडत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात दर पन्नास वर्षातून एकदा तरी मोठा भीषण दुष्काळ पडत असे. १३९६ ते १७९२ पर्यंत महाराष्ट्रात बऱ्याच वेळा दुष्काळ पडले. अशा दुष्काळामध्ये हजारो माणसे मरत असत.

१६२९-३१ च्या दुष्काळात शहाजनानने निवारागृहे सुरू केली. जनतेला अन्न-धान्य पैसा तसेच जनतेवरील कर माफ केले. १६६१ च्या दुष्काळात औरंगजेब स्वत: देखरेख करीत होता. त्याने आपला खजिना खुला करून अन्न-धान्य साठाआयात केला. त्याप्रमाणे पेशव्यानिमुद्धा बऱ्याच प्रमाणात अन्नधान्य आयात केले होते. त्यावेळी सिंचन सुविधा, विज्ञान-तंत्रज्ञान, दळण-वळणाच्या सोयी नव्हत्या. त्यामुळे दुष्काळाचे उच्चाटन करण्यास खूपच मर्यादा पडे. कारण सर्व शेती ही पावसावर अवलंबून होती.

## ५. २ ब्रिटिशांचे दुष्काळ निवारण धोरण :-

ब्रिटिश पूर्व काळाप्रमाणे प्रथम ब्रिटीशांनी सारामाफ कर रद्द करणे हे सुरवातीच्या काळात अवलंबिले परंतु १८५८ मध्ये त्याचे रीतसर सरकार स्थापन झाल्यानंतर मात्र ताठर भूमिका घ्यायला सुरवात केली. त्यावेळी शेतकऱ्यांना कसलीही मदत देत नसत. १९ व्या शतकामध्ये शेतकऱ्यांच्याकडून पैन् पै सारा वसूल केला. त्यावेळच्या रोजंदारीचे दर फार कमी असत त्यामध्ये मजूरांचे पोटसुद्धा भागत नसे

ब्रिटीशांनी त्यांच्या साम्राज्याच्या फायद्यासाठी आधूनिक पध्दतीच्या जोरावर भारताला वसाहत बनवून टाकले त्यामुळे अर्थव्यवस्था कंगाल बनली राष्ट्रीय चळवळीच्या राजकिय दडपणामुळे दुष्काळ निवारणात त्यानां काही बदल करावे लागले. यानंतर दुष्काळाची भिषणता कमी कमी झाली पण वारंवारता घटली नाही.

स्वातंत्र्य पूर्व काळातील दुष्काळ निवारण धोरण व ब्रिटीश दुष्काळी धोरण यामध्ये तफावत आहे. प्राचीन काळी सुविधा कमी होत्या. त्यामुळे निवारण होत नव्हते परंतू ब्रिटीशांनी स्वत:च्या स्वार्थासाठी जनतेची पिळवणुक केली.[३]

दुष्काळासंबंधी भारतीय नेते दादाभाई नौरोजी, गोपाळ कृष्ण गोखले, या भारतीय चळवळीच्या नेत्यांनी म्हटले होते. ब्रिटीशांनी भारतीची लूट केल्यामुळे भारतातील दारिद्रय वाढले व त्यामुळे दुष्काळ हे मूळ बनले. त्यांनी सांगितले होते की ब्रिटीश गेल्याशिवाय दुष्काळ हटणार नाही परंतू स्वातंत्र्यानंतरही विशेषत: १९६० मधील महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सुद्धा हा प्रश्न मार्गी लागेल अशी अपेक्षा होती. परंतू काही थोड्या फार प्रमाणात पावले शासनाने उचलली. परंतू ठोस निर्णय काही घेतले नाहीत.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेल्या चाळीस वर्षात महाराष्ट्रात १९५२ ते १९८७ पर्यंत मोठे-चार दुष्काळ पडले. पाच-दहा वर्षांनी एक मोठा दुष्काळ व स्थानिक दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडत असतात. १९६० पासून सरकारला तीन समित्या नेमाव्या लागल्या. त्यामध्ये जवळ-जवळ ८९ तालुके दुष्काळ प्रवण म्हणून निश्चित केले. १९८६-८७ ची दुष्काळग्रस्त संख्या १४ हजार गावातील संख्या चोवीस हजारापेक्षा जास्त होती व हे लक्षात घेतल्यास दुष्काळग्रस्त लोकसंख्या दोन ते अडीच कोटीच्या घरात जाईल. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्व दुष्काळाचा आढावा घेतला तर ब्रिटीश काळाप्रमाणेच दुष्काळ राहिला आहे.

महाराष्ट्रात स्वातंत्र्यानंतर शेतीविकास झाला, सोयी उपलब्ध झाल्या. पण दुष्काळ हटला नाही. एकंदर शेतीव्यवसाय व सर्व जनता आर्थिक दृष्ट्या सुदृढ झालेली नाही याचे कारण काय तर आजचे सरकार ब्रिटीशांचीच निती चालवत आहे. याचा उपयोग फक्त जमीनदार, बागायतदार, सावकार, व्यापारी यांना होतो व गरीब शेतकरी कष्टकरी मजूर हा भरडला जातो.

दुष्काळाचे उच्चाटन करायचे असेल तर तीन गोष्टी करणे आवश्यक आहेत.

१) जास्तीत जास्त शेती क्षेत्र सिंचनाखाली आणून अवर्षणमुक्त करणे.

२) शेती क्षेत्राला पूर्ण आर्थिक स्थैर्य मिळवून देणे.

३) बिगरशेती व्यवसायांचा व औद्योगिक क्षेत्रांचा असा विकास करणे की, ज्या योगे भरघोस व सुदृडशेती विकास साधता येईल आणि शेतीतील अतिरिक्त लोकसंखेला खात्रीचा रोजगार उपलब्ध होईल.[४]

## ५. ३ पाण्याचा नियोजीत वापर :-

सर्व खोऱ्यांचा अभ्यास केला तर आजपर्यंत पाण्याचा वापर स्वातंत्र्योत्तर काळात, सिंचनक्षम १९.५० दशलक्ष हेक्टर पासून सहाव्या योजने अखेर ६८ दशलक्ष हेक्टरपर्यंत वाढ झाली आहे. इ. स.

२००० सालापर्यंत होणाऱ्या संभाव्य १०० कोटी लोक संख्येच्या उदरभरणासाठी अन्नधान्याचे वार्षिक उत्पादन सध्याच्या ११० मे. टनावरून २४० मे. टनापर्यंत वाढवणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे ग्रामीण, शहरी, विद्युत, औष्णीक विद्युत केंद्रातर्फे वीज उत्पादनासाठी पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. त्यामुळे पाण्याच्या या मोठ्या मागणी मुळे भविष्य काळात मोठ्या प्रमाणात दुर्भिक्ष जाणवण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्राचा भौगोलिक विचार करीत असताना एक प्रकर्षाने जाणवते की कोकण किनारपट्टी व त्यालगतचा डोंगर रांगाचा प्रदेश ह्यामध्ये पावसाचे प्रमाण २००० ते ४००० मि. मी. आढळते त्या मानाने कोकणचा विकास झालेला नाही. कारण त्या भागामध्ये सिंचनाचा विकास झालेला आढळत नाही.

पश्चिम घाटांचा विचार करत असताना कोकणापेक्षा पर्जन्यमान कमी जाणवते परंतू या भागाचा शेतीचा विकास बऱ्यापैकी आढळतो. व उत्पन्नाच्या क्षेत्रामध्ये सुद्धा खूप आघाडीवर आहेत. अवर्षणाचा भाग व पूर्वेकडचा भाग पाहिला तर पूर्वेकडे पर्जन्यमान बऱ्यापैकी आहे. व अवर्षणामध्ये पाण्याअभावी हा भाग विकसीत झालेला नाही.

ह्या अवर्षण भागाचा विकास होण्यासाठी महाराष्ट्र सरकार, आंध्रप्रदेश, कर्नाटक यांच्या मध्ये १९७६ साली पाण्याचा लवाद निर्णयाप्रमाणे महाराष्ट्राच्या वाट्यास ५९४ हजार दशलक्ष घनफूट येते व या पाण्याचा वापर २००० पर्यंत झाला पाहिजे. त्यामध्ये २६३ हजार घनफूट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण झाले असून ३०६ हजार प्रकल्पाचे काम चालू आहे. व त्यामधीलच हा एक प्रकल्प येत आहे.

स्वातंत्र्य पूर्व, स्वातंत्र्योत्तर दुष्काळांचा अभ्यास करता हे जाणवून आले की सिंचन क्षेत्राचा विकास कमी झाल्यामुळे दुष्काळ हे प्रकर्षाने जाणवत आहेत. व दुष्काळ हे कमी करायचे. असल्यास सिंचन क्षेत्र वाढवून शेतीचा विकास केला पाहिजे म्हणजे दुष्काळाची तीव्रता कमी होईल.[5]

अवर्षण प्रवण तालुक्यापैकीच सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुका आहे. सांगली जिल्हयातील पूर्वेकडील पठारावरील भरडमाळांचा हा प्रदेश आहे. कृष्णा नदी या जिल्ह्यातून जाते. परंतु डोंगर रांगांच्या खालून ही नदी जात असल्यामुळे नदी काठचा प्रदेश हा सुपीक आहे. परंतु डोंगरावरची माळराने कायम दुष्काळामध्ये आहेत. पाण्यासाठी या भागातील जनता अजूनसुद्धा रानोमाळ फिरते आहे. आणि याच भागामध्ये भविष्यकाळ उज्वल करणारा ताकारी प्रकल्प सध्या पूर्णत्वाकडे झुकलेला आहे.

## ५.४ दुष्काळी भागासाठी वरदान देणारी योजना :-

वसंतराव दादा यांनी मुख्यमंत्री असताना ही दुष्काळी भागासाठी योजना मंजूर केली. पण त्यांच्या पश्चात या योजनेचे दिंडवडे काढले. खानापूर तालुक्यातील दुष्काळी भागाचे नंदनवन करणारी ही ताकारी योजना आहे. हा प्रकल्प वाळवा तालुक्यातील ताकारी या गावापासून सुरू होतो व तेथून ते पाणी दोन टप्प्यामध्ये दुष्काळी तालुक्यासाठी वर आणावयाचे आहे.

ही योजना चालू झाल्यापासून रेंगाळत पडली होती. ही योजना १९८४ साली सुरू झाली. परंतू १९९५ पर्यंत हीचे काम धीम्या गतीने चालू होते. ह्या काळामध्ये काँग्रेसची राजवट चालू होती. १९९५ पासून शिवसेना-भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतर या याजनेला गती मिळाली.

## ५.५ ताकारी योजना तांत्रीक अडचणींमुळे रखडली :-

ताकारी पंप टप्पा क्र. १ चे काम हे १९८८ मध्ये सुरू करण्यात आले होते. तथापि या पंपगृहाची भौगोलिक स्थिती चमत्कारीक होती. पंपगृह कृष्णा नदीच्या पात्रापासुन सुमारे २६० मीटरवर आहे. जवळच्च तुपारी ओढा, उत्तरेला कृष्णा कालवा, आणि पश्चिमेला बागाईत जमीन आहे. पंपाचा पाया ७-८ मीटर खाली आहे. कार्यस्थळावर काळी पांढरी वाळू मिश्रीत माती आहे. त्यामुळे जमिनीच्या पोटात नैसर्गिक उमाळे अस्तित्वात असून सर्व बाजूनी कार्यक्षेत्रावर पाणी येते. कृष्णा नदीचे पाणी हटतच नसे. त्यामुळे विहीर चहुबाजुंनी ढासळत असे. इ. अडचणी प्रत्यक्ष काम करताना होत्या काम अशक्यप्राय वाटून काही कंत्राटदारांनी काम सोडून दिले होते. तसेच काही कंत्राटदार गायब होते. काही जण 'बड्यांचे' संबंध दाखवून कामच्च करीत नव्हते. काही कंत्राटदारांच्यावर न्यायालयात खटले होते. काहींना सिमेंट, पैसे, आगाऊच्च घेतले होते. काही कंत्राटदारांना ते काम करीत नाहीत म्हणून खात्यामार्फत त्यांच्याकडून दंड वसूल केला जात होता. अशा विविध कारणांनी ही योजना रेंगाळत पडली होती. ही योजना प्रथम ८३ कोटीची होती. सध्या तिची किंमत ४०२.७ कोटी झाली आहे.[१]

## ५.६ राजकीय प्रवाह बदलाचा परिणाम :-

ताकारी योजना ही खानापूर तालुक्यातील राजकारणाशी संबंधीत आहे. व तीच्यावर राजकारणाचे पडसाद मोठ्या प्रमाणावर उमटले. तालुक्याच्या राजकारणामध्ये काँग्रेस व शेतकरी कामगार पक्ष हे दोन पक्ष तालुक्याच्या राजकारणात प्रभावी होते. प्रत्येक निवडणुक ही काँग्रेस व शे. का. प. मध्ये लढली जात होती.

१९५२ च्या निवडणुकीमध्ये तालुक्याचे काँग्रेस उमेदवार कै. दत्ताजीराव देशमुख हे आमदार होते. तर १९५७ च्या निवडुकीमध्ये शे. का. प. चे भाई भगवानराव मोरे 'बप्पा' हे आमदार म्हणून निवडून आले. १९६७ च्या निवडणुकीमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमुळे काँग्रेसचे संपतराव माने आमदार झाले ते. १९७८ पर्यंत त्यानंतर काँग्रेसच्या मक्तेदारीला अपक्ष उमेदवार बाबासाहेब देशमुख यांनी सुरूंग लावला व आमदार झाले. १८८० साली 'एस' काँग्रेसचे हणमंतराव पाटील व त्यानंतर संपतराव माने व नंतर अनिल बाबर व नंतर राजेंद्र अण्णा असा फरक होऊन नंतर राष्ट्रवादीचे अनिल बाबर सद्या कार्यरत आहेत.

खानापूर आटपाडी मधून दुसरा भिलवडी वांगी हा मतदार संघ तयार झाला. हा मतदार संघ ताकारी प्रकल्पामध्ये येतो. १९७८ साली काँग्रेसचे संपतराव चव्हाण हे आमदार झाले. त्यानंतर १९८० साली बंडखोर उमेदवार पतंगराव कदम याना पराभूत करून पुन्हा तेच निवडून आले ते १९८५ पर्यंत. नंतर काँग्रस व अपक्ष यांच्यामध्ये लढत होवून अपक्ष उमेदवार पतंगराव कदम हे निवडून आले. त्याचवेळी मुक्तीसंघर्ष चळवळीने आपला पाणी प्रश्नावरील लढा चालूच ठेवला होता. आणि शे. का. पक्षाची बरीच मंडळी या चळवळी मध्ये सहभागी होती व काँग्रेस विरोधी आपले धोरण कायम ठेवत होती. या मतदार संघामध्ये काँग्रेस उमेदवार संपतराव चव्हाण उभे होते. व अपक्ष उमेदवार पतंगराव कदम हे होते.

नुकतीच पाणी परिषद मंगरूळ चिंचणी येथे झाली होती. व ताकारी पाणी वाटप परिषद भरली होती. व चळवळीचे जागृतीचे काम चालू होते. या पार्श्वभूमीवर या निवडणुकीमध्ये क्रांतीअग्रणी जी. डी. लाड यांनी अपक्ष उमेदवार पतंगराव कदम यांना ताकारीचे पाणी वर उचलून टाकत असाल तर आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ असे त्यांनी सांगितले आणि त्यानी ते मान्य केले त्यानंतर त्यांना भिलवडी-वांगी या मतदार संघामध्ये निवडून आणले.

आमदार झाल्यानंतर कदम यांनी त्याच्या शैक्षणिक क्षेत्रात चांगली प्रगती केली.पण योजनेकडे जेवढे लक्ष द्यायला पाहिजे तेवढ दिले नाही. योजना तशीच लोंबकळत पडली. पुन्हा १९९० मध्ये जी. डी. लाड हे काँग्रेस उमेदवार श्री पतंगराव कदम यांच्या विरूद्ध सदर मतदार संघात उभे राहिले पण जी. डी. लाड यांना पराभव पत्करावा लागला. याच काळात पतंगराव कदम हे शिक्षणमंत्री, तसेच काही दिवस पाटबंधारे मंत्री होते. या काळात सुद्धा योजनेला गती लागली नाही. योजना ही रखडतच गेली लोकांच्या मनामध्ये शंका व्यक्त होऊ लागल्या की योजना पूर्ण होते किंवा नाही.

त्यानंतर १९९५ सालच्या निवडणुकीमध्ये खानापूर पंचायतीचे काही वर्षे सभापतीपद व जि. परिषदेचे शिक्षण सभापतीपद चांगल्या रितीने हाताळलेले संपतराव देशमुख हे विधान सभेला उभे राहिले त्यामुळे कॉंग्रेस व अपक्ष अशी चुरशीची निवडणुक झाली व त्यामध्ये पतंगराव कदमांना पराभव पत्कारावा लागला. यावेळी जी. डी. बापुंचे सहकार्य संपतराव देशमुखांना मिळाले होते.[७]

त्यावेळी युतीचे सरकार अल्प मतात होते व अपक्ष आमदार बरेच निवडून आले होते. व त्यांना सरकार बनविण्यासाठी काही अपक्षांची गरज होती. व त्यांनी पाणी प्रश्नावर त्यांना पाठिंबा दिला व युतीचे सरकार स्थापन झाले. या पार्श्वभूमीवर ताकारी प्रकल्पाचे मूल्यमापन करत असताना कै. संपतराव देशमुखांनी या योजनेला गती लावली. तसेच त्यांच्या निधना नंतर त्यांचे पुतणे आ. पृथ्वीराज देशमुख यांनी आपल्या चुलत्यांच्या वचनांची पूर्तता करण्यासाठी योजनेला चांगली गती दिली व योजना पूर्णत्वाच्या मार्गावर नेली.

## ५.७ मुक्ती संघर्ष चळवळीचा प्रभाव :-

प्रस्तुत निबंधाचा अभ्यास करत असताना खानापूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी चालवलेल्या लढ्याचा परिणाम ताकारी योजनेला उपयोगी ठरला. तालुक्यातून पाणी परिषदा, मोर्चे, घेराव इ. तंत्राचा अवलंब करून शासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला.

यामध्ये प्रामुख्याने डॉ. भारत पाटणकर, क्रांतीवीर नागनाथ नायकवडी, संपतराव पवार, डॉ. बाबुराव गुरव इ. अनेक नेत्यांनी दुष्काळी लोकांसाठी समान पाणी वाटप पद्धतीने पाण्याचे वाटप झाले पाहिजे. यासाठी १३ दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये चळवळी सुरू केल्या त्या अजून सुद्धा कार्यरत आहेत. अशा आंदोलनाच्या मार्गातून कृष्णा खोऱ्यामधील प्रकल्पाना मूर्त रूप आणण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. अशा प्रकारे ताकारी योजनेचा राजकिय अभ्यास करीत असताना मुक्ती संघर्ष चळवळीचा प्रभाव जाणवतो.[८]

## ५.८ आघाडी सरकारचा योजनेवर परिणाम :-

प्रस्तु:त अभ्यासामध्ये युतीचे सरकार असताना नागनाथ अण्णांच्या पाणी परिषदेला सध्याच्या आघाडी सरकारमधील बऱ्याच मंडळींनी पाणी परिषदेला आपला पाठिंबा दर्शविला होता. त्यामध्ये आर. आर. पाटील, भाई गणपतराव देशमुख, लक्ष्मणराव ढोबळे इ. सध्या ह्या व्यक्तीना मंत्रीपदे मिळाली

आहेत. त्यामुळे पाणी परिषदेला वाटले की आता तरी आपल्या प्रश्नाला न्याय मिळेल. परंतु सत्तारूढ पक्षाने युती सरकारचे तुणतुणे वाजवायला सुरूवात केली. हीच मंडळी युतीवर टिकेची झोड उसळत होती. आता मात्र मुग गीळून गप्प आहेत. ३१ मे २००० जवळ येत असून आघाडी सरकारचे धोरण योजना पूर्णत्वाच्या मार्गाला लावण्याच्या प्रयत्नात आहेत.

## ५. ९ ताकारी योजनेची शेतकऱ्या मधील ओढ :-

शेतकऱ्यांच्या मनामध्ये पाणी येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. योजनेचे पाणी शेतामध्ये येणार अशा आनंदामध्ये या दुष्काळी भागांमधील जनतेच्या आशा निर्माण झाल्या आहेत. वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण, संपतराव देशमुख, पतंगराव कदम, जी. डी. लाड या भागातील सर्व नेत्यांनी योजनेला मूर्त स्वरूप आणले आहे . त्यामध्ये आ. पृथ्वीराज देशमुख यांनी योजनेसाठी खूप प्रयत्न केले आहेत . अशा प्रकारचा काही शेतकऱ्यांन मधून त्यांची स्तुती होत आहे असे दिसून येते.[९] तर काही शेतकरी हे यावर नाराज आहेत. कारण सरकार योजनेवर जास्त पैसा खर्च करत नाही. व्यवस्थितरित्या काम होत नाही. पाणी हे परवडणार का ? पाणी पट्टी कशी बसणार ? आमचे कर्ज फिटणार का ? आमची कोरडवाहू शेती आहे ही बरी आहे. अशा प्रकारचा नाराजीचा सूर शेतकऱ्यांच्या कडून ऐकावयास येतो.

यामध्ये प्रकर्षाने एक गोष्ट जाणवली की, पाणी पट्टी किती येणार. हा प्रश्न मात्र वारंवार जाणवला. पण योजना ज्यावेळी मार्गी लागेल त्यावेळीचे सरकार यावर पाण्याचा दर काय ठेवायचा हे ठरवणार.
युती शासनावर या पाणी संदर्भामध्ये जास्त प्रमाणावर टिका केलेली दिसते. पाणी संघर्ष चळवळी पण सध्या आघाडी सरकारचे धोरण पाण्याविषयी काय आहे हे समजल्यावर पाणी संघर्ष चळवळीचाअपेक्षा भंग झाला आहे. कारण पाणी परिषदेत असणारी मंडळी आजच्या सरकारमध्ये आहेत. त्यामुळे त्यांना मुक गिळून गप्प बसावे लागले आहे. व पाणी संघर्ष चळवळीने आपला लढा या शासनाबरोबर तीव्र केला आहे.

मुक्ती संघर्ष चळवळीने पर्यायी योजना व तिचा खर्च याचा अभ्यास केला असता दुष्काळी भागातील प्रत्येक दर कुटुंबामागे ३००० घनमीटर पाणी वाटले तर सर्व दुष्काळी भागाला पाणी मिळेल. व अशा प्रकारचा उपक्रम सरकारने राबवला तर सर्व दुष्काळग्रस्त जनतेला पाणी मिळेल.[१०]

योजनेच्या तांत्रीक कामामध्ये विशेषकरून टप्पा क्र. १ हा तारेवरील कसरत म्हणावा लागला. कारण १९९८ पर्यंत त्यांच्याशी निकराची झुंज टप्पा क्र. १ चे कार्यकारी अभियंता रविंद्र गुडसकर यांनी दिली व त्याला आज पूर्णत्वाचा आकार देत आहेत. त्यामधील कंत्राटदार काम स्विकारत नव्हते अशा परिस्थितीमध्ये हे एक आव्हाण स्विकारून त्यांनी या कामास गती देऊन हे पाणी जून पर्यंत कालव्यात फेकण्याचा प्रयत्न आहे. कारण सर्व काम हे जवळ जवळ पूर्ण झालेले आहे."

## ५. १० भिलवडी-वांगीचे राजकारण व ताकारी योजना :-

प्रस्तुत प्रबंधामध्ये राजकिय अभ्यास करत असताना भिलवडी वांगी या मतदार संघाशी हे राजकारण प्रत्येक वेळी फिरले आहे. सध्याचे उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम, शे. का. प. चे जी. डी. लाड, कै. संपतराव देशमुख, आ. पृथ्वीराज देशमुख व संपतराव चव्हाण हे या मतदार संघाचे प्रमुख नेते आहेत. उद्योग मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी शैक्षणीक कार्यामध्ये मोठा विकास केला. त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. तसेच त्यांनी सोनहिरा सह. साखर कारखाना लि. वांगी येथे सुरू केला आहे. सांगरेश्वर सूत गिरणी काढली आहे व तालुक्याच्या राजकारणामध्ये व विकासास सुरूवात केली आहे. त्याप्रमाणे ५ वर्षे मंत्री पदे भोगली आहेत.

त्याचप्रमाणे जी. डी. लाड यांची कांतीसिंह साखर कारखान्याची उभारणी चालू आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अशा प्रकारे त्यांनी तालुक्याच्या विकासास गती दिली आहे. तसेच संपतराव चव्हाण यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये निस्वार्थीपणे कामे केली आहेत. ताकारी योजना मंजूर करून घ्यायला हातभार लावला आहे.

टेंबु योजनेचे शिल्पकार कै. आ. संपतराव देशमुख यांनी आपल्या पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामधील विविध पदावर काम करून भिलवडी-वांगीचे आमदार झाल्यानंतर ताकारी योजनेला गती दिली. डोंगराई सागरेश्वर सह. साखर कारखाना चालू होत आहे. त्याचप्रमाणे सुतगिरणी चालू करून एक प्रकारचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. त्यांच्याअकाली निधनानंतर या मतदास संघाचे प्रतिनिधीत्व आ. पृथ्वीराज देशमुख यांनी केले. कै. संपतराव देशमुख यांच्या स्वप्नांची पूर्ती करण्यासाठी अहोरात्र कष्ट क रून कोणतीही सत्ता हाती नसताना ताकारी सारख्या योजनेला गती देवून योजना पूर्णत्वाकडे आणली. शासन

दरबारी हिसखे घालून काम करून घेणे एवढे सोपे नाही. आज त्यांनी डोंगराई सागरेश्वर साखर कारखाना हा चालू स्थितीमध्ये आणला आहे. सूतगिरणी उभ्या केल्या, टेंबू योजनेला गती दिली. अशा प्रकारे त्यांनी तालुक्यात विकासाला चालना दिली आहे.

ताकारी योजनेचे श्रेय देत असताना योजना चालू झाल्यापासून प्रत्येक वर्षी झालेला खर्च व कामाची गती पहात असता १९८५ ते १९९५ पर्यंत डॉ. पतंगराव कदम हे आमदार व मंत्री होते. त्यांच्या हाती सत्ता असताना सुद्धा या कालावधीमध्ये योजना पूर्ण व्हायला पाहिजे होती. पण या योजनेकडे त्यानी फारसे लक्ष दिले नाही.

१९९५ ते १९९९ पर्यंत कै. संपतराव देशमुख व त्यानंतर आ. पृथ्वीराज देशमुख यांनी प्रतिनिधीत्व केले. या प्रबंधाचा अभ्यास करत असताना सर्व योजनेचे काम पहात असता आत्तापर्यंतचा आढावा घेतला तर या योजनेच्या भागावर प्रत्येक वर्षाचा खर्च पाहिला व कामाचे प्रमाण जाणून घेतले तर १९९५ ते ९९ पर्यंत योजनेवर चांगल्या प्रकारे खर्च झालेला आहे व कामाची गती सुद्धा चांगली आहे. या काळात पृथ्वीराज देशमुख यांनी या भागाचे नेतृत्व केले आहे. तसेच मुक्ती संघर्ष चळवळीनेही या योजनेच्या कामाच्या गतीला हातभार लावलेला दिसतो. व याचे श्रेय आ. पृथ्वीराज देशमुख यांना देण्यास हरकत नाही असे वाटते.

प्रस्तुत प्रबंधाचा अभ्यास मला मिळालेल्या उपलब्ध साधन सामुग्रीवर पूर्ण केलेला आहे. ही योजना अलिकडच्या काळातील आहे. यावर जास्त लिखाण झालेले नाही. उपलब्ध साहित्याद्वारे याचा अभ्यास करून मला जे वाटते ते मी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या लोकशाही परंपरेने चाललेल्या देशामध्ये अनेकांची अनेक मते असू शकतात. माझ्या अभ्यासात जे आले ते मांडण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.

# ꧁ संदर्भ ꧂


१) श्री. मोहन आबा भोसले : देवराष्ट्रे, 'मुलाखत' दि. २३/४/२०००.

२) दत्ता देसाई : पाणी विशेषांक परिसरवार्ता, १९८८ पानं नं. ५

३) महाराष्ट्र सिंचन आयोग : १९६२, पान नं. ५०

४) अवर्षण प्रवण क्षेत्र पुनर्विलोकन समिती अहवाल (१९९७)

५) महाराष्ट्रातील शेती आणि पाण्याचे नियोजन, समाज प्रबोधिनी, इचलकरंजी

६) सामना दै. १२ ऑक्टोबर १९९७

७) जी. डी. लाड, यांची 'मुलाखत' ३१ डिसेंबर १९९९

८) दै. पुढारी, दि. ३०/४/२०००

९) विकास बाबुराव मोहिते, मो. वडगाव - 'मुलाखत', दि. २३/४/२०००

१०) दै. पुढारी, दि. ३०/४/२०००

११) कार्यकारी अभियंता रविंद्र गुडस्कर - 'मुलाखत', दि. ५/४/२०००